राज्यातील २४ प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये अत्याधुनिक IoT आधारित फायर अलार्म यंत्रणा बसविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

परिवहन विभाग

शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०९२५/प्र.क्र.२९१ /परि-४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक : २० ऑगस्ट, २०२६.

वाचा:- परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. पआका/का.१०/रवका/ FIRE/२०२६/ /जा .क्र.८६१२, दि. २९ जुलै, २०२६.

प्रस्तावना :-

राज्यातील २४ प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये IoT आधारित फायर अलार्म यंत्रणा बसविणे या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय: -

परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त वाचा येथील दि. २९.०७.२०२६ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन राज्यातील २४ प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये IoT आधारित फायर अलार्म यंत्रणा बसविण्याकरिता सोबतच्या “परिशिष्ट-अ” मधील कार्यालयामध्ये “परिशिष्ट-ब” मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे रुपये १४,९१,०९,५१०/- (अक्षरी रुपये चौदा कोटी एक्यान्नव लाख नऊ हजार पाचशे दहा फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

२. **अटी व शर्ती :-**

१) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतुदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

२) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही - २०१३ /प्र.क्र.१७७/तां.क.१, दिनांक १०.०१.२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

३) सदर कामाचा खर्च गृह (परिवहन) विभागाच्या उपलब्ध असलेल्या नियतव्ययामधून करण्यात येईल.

४) नियोजित जागा ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुनच सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

५) सदर कामाची ई-निविदा करताना कामाचे तुकडे न करता एकत्रित निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

३. यासाठी होणारा खर्च "मागणी क्र. बी-३, २०४१ उपलेखाशिर्ष वाहनांवरील कर, संचालन व प्रशासन (०१) परिवहन आयुक्त (०१) (०७), (२०४१ ०३३२) ५२ - साधन सामुग्री खरेदी या लेखाशीर्षांतर्गत मंजूर अनुदानातून खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, दिनांक ११.०८.२०२६ मधील भाग-पहिला, उपविभाग-दोन, अनु.क्र. ०५, नियम क्र.०७ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०८२०११५२४८२३३९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHETAN BALASAHEB NIKAM

Digitally signed by CHETAN BALASAHEB NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=946F8EFF01148466E26F8D80863DA34D0A26661F5EEFB602C359549D8ED4511E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7268DE40660971F80951C66D0E657E903B378196F51A978D2A366CF5EB564C0C, cn=CHETAN BALASAHEB NIKAM
Date: 2026.08.20 11:54:15 +05'30'

(चेतन निकम)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव.
३. मा. राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव.
४. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, १/२, मुंबई /नागपूर
५. अपर मुख्य सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय.
६. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. परिवहन उप आयुक्त (निरीक्षण/लेखा), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.
८. संबधित प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.
९. कक्ष अधिकारी (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती (परि-४) .

परिवहन विभाग, शासन निर्णय क्रमांक- एमव्हीडी-०९२५/प्र.क्र.२९१ /परि-४, दि.२०.०८.२०२६ सोबतचे **परिशिष्ट-अ**

Descriptive Schedule

Sr. no.	Regional / Deputy regional Transport Office Name	CMS Panel	smoke detector	Heat detector	Manual call Point (MCP)	Hooter Panel	Monitoring Panel	Auto Dialer
१	Kolhapur	१	२८२	०	१५	१६	१	१
२	Sangli	१	४२	०	५	५	१	१
३	Ichalkarnji	१	४८	१	४	४	१	१
४	Karad	१	२३३	२	११	११	१	१
५	Satara	१	१७५	०	१०	१०	१	१
६	Phaltan	१	३३	०	३	३	१	१
७	Akluj	१	२२९	२	११	११	१	१
८	Baramati	१	३०७	३	१४	१७	१	१
९	Pune-१ Alandi road	१	३३	२	२	२	१	१
१०	Pune -२ Sangam ११Bridge	१	४२	०	२	२	१	१
११	Pi१२mpari chin१३chwad	१	२४५	०	११	११	१	१
१२	Thane RTO२	१	१७४	०	१२	१४	१	१
१३	Solapur	१	२२९	०	१३	१३	१	१
१४	Sindhudurg	१	२०३	०	१०	१०	१	१
१५	Ratnagiri	१	१८७	०	१०	१०	१	१
१६	Nashik	१	२१२	०	१०	१०	१	१
१७	Malegaon	१	१८३	०	११	११	१	१
१८	Wardha	१	२२५	०	९	९	१	१
१९	Pen	१	६८	०	३	३	१	१
२०	Panvel	१	११८	०	७	७	१	१
२१	Borivali	१	४५	०	२	२	१	१
२२	Mumbai Central	१	२१९	१	११	११	१	१
२३	Vasai	१	५६	०	२	२	१	१
२४	Andheri	१	७१३	४	२९	३५	१	१
Total		२४	४३०१	१५	२१७	२२९	२४	२४

सोबतचे **परिशिष्ट-ब**

Work Abstract

Sr. no.	CSR Item No	Quan tity	Item Description	Rate	Unit	Amount
१	Non CSR	२४	Supply Installation, Testing and Commissioning of Wireless Addressable Centralized Monitoring Station (CMS PANEL) using ७"colour display. in built hooter ११० with devices in its circuits.	३७७०००.००	Each	९०,४८,०००.००
२	Non CSR	४३०१	Supply, Installation, Testing and Commissioning of wireless Addressable Smoke detector using Mesh Topology Technology with optical sensor.	२१०००.००	Each	९,०३,२१,०००.००
३	Non CSR	१५	Supply, Installation, Testing and Commissioning of wireless Addressable Heat detector using Mesh Topology Technology with optical sensor.	२२२००.००	Each	३,३३,०००.००
४	Non CSR	२१७	Supply, Installation, Testing and Commissioning of wireless Addressable Manual call point (MCP) using Mesh Topology Technology.	९०००.००	Each	१९,५३,०००.००
५	Non CSR	२२९	Supply, Installation, Testing and Commissioning of Control Panel with Hooter with Battery Backup for १२ hr. using Mesh Topology Technology. The control panel controls the signals of all types of devices like smoke Detector, MCP, LPG. etc...	७२०००.००	Each	१,६४,८८,०००.००
६	Non CSR	२४	Supply, Installation, Testing and Commissioning of Cloud Based Monitoring Portal for monitoring of system with alert & alarm generation.	१७७०००.००	Each	४२,४८,०००.००

७	Non CSR	२४	Supply, Installation, Testing and Commissioning of Auto Dialer Tone based १० no॰s Auto Dialer (SMS & CALL) sequence wise as per added contacts numbers.	३५०००.००	Each	८,४०,०००.००
Sub Total of Work Portion in RS						१२,३२,३१,०००.००
Contingency ३ %						३६,९५,९३०.००
On Total work (Add GST १८%)						२,२१,८१,५८०.००
Grand Total in Rs.						१४,९१,०९,५१०.००
Say Rs.						१४,९१,०९,५१०.००